# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०६ मार्च, २०२५ / फाल्गुन १५, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २९**

---

### रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचे अनेक वर्षांपासून पुनर्वसन न झाल्याबाबत

**(१) * २७५९ श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील विविध प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुनही मागील अनेक वर्षापासून त्यांचे पुनर्वसन होत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पेण (जि.रायगड) तालुक्यामधील बाळगंगा धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अद्यापही पूर्ण झाले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना अद्यापही जमिनीचा मोबदला न मिळणे, त्यांचे पुनर्वसन प्रलंबित असणे, दळण-वळण रस्ते दुरूस्ती, नागरी सुविधा, पुनर्वसन पॅकेज, बागायती फळझाडे व वनझाडे यांची राहिलेली अर्धवट मोजणी, कुटुंबसंख्या तफावत, आदिवासी, कातकरी, ठाकूर व अन्य मागासजाती यांना मोफत घरे इत्यादी अनेक कारणास्तव प्रकल्पबाधित लोकांना याचा लाभ अद्यापही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या विविध मागण्यांबाबत या अगोदर अनेकदा आंदोलने केल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बाळगंगा प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनासंदर्भात तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री महोदयांना मागील काळात निवेदन देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) ते (६) बाळगंगा प्रकल्पाच्या भूसंपदनासाठी रु.४२६.२६ कोटी रक्कमेचे संबंधित प्रकल्पबाधितांना वाटप करण्यात आले असून उर्वरित प्रकल्पबाधितांना भूसंपादनाचा मोबादला वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रकल्पबाधितांची कुटूंबसंख्या निश्चित करुन सुधारित पुनर्वसन आराखडा विभागीय आयुक्त, कोकण यांच्यामार्फत दिनांक १२.०२.२०२५ रोजी शासनास प्राप्त झाला असून, सदर पुनर्वसन आराखड्याची छाननी करुन अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. पुनर्वसन आराखड्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन करावयाच्या ठिकाणी दळण-वळण रस्ते नागरी सुविधा, घर बांधणीसाठी अनुदान इ. बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. बाळगंगा प्रकल्पाशी संबंधित आंदोलनातील आंदोलकावर दाखल गंभीर गुन्ह्याव्यतिरिक्त इतर गुन्हे मागे घेण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबत

**(२) * १२०६ श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायत अशा प्रकारच्या विविध नागरी क्षेत्रापासून जवळ वा त्या क्षेत्रात समाविष्ट झालेल्या गावातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना शासनाच्या नियमांमुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून नवीन विहिर वा अन्य कोणत्याही योजनांचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या शासन निर्णयामुळे नागरी वसाहतीपासून पाच ते दहा किलोमीटर अंतरावरील शेतकऱ्यांना याचा लाभ घेता येत नसल्याने अनेक शेतकरी या योजनांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन राज्यातील २८ महानगरपालिका, ३७ नगरपालिका, २२६ नगरपरिषद व १२५ नगरपंचायतींना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा लाभ मिळण्यासाठी सदर योजनांच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २४.०४.२०१८ च्या शासन पत्रानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेमध्ये नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत नाही.

तथापि, ग्रामपंचायत क्षेत्रातील शेतकऱ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेमध्ये समाविष्ट घटकांचा लाभ देण्यात येतो. दिनांक १.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ मध्ये योजनातंर्गत घटकांचे आर्थिक निकषांमध्ये सुधारणा तसेच नवीन घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये नवीन विहीर या घटकासाठी अनुदान मर्यादा रुपये २.५० लाख वरुन वाढवून रुपये ४.०० लाख करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक २४.०४.२०१८ च्या शासन पत्रानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेमध्ये नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना लाभ अनुज्ञेय नाही. तथापि, नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्राबाहेर असणाऱ्या ग्रामपंचायत क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी कोणत्याही विशिष्ट अंतराची अट नाही.

सदर योजनेंतर्गत मागील तीन वर्षांमध्ये (सन २०२१-२२ ते २०२३-२४) आत्तापर्यंत ३२,८२३ शेतकऱ्यांना रुपये ४२४.८२ कोटी अनुदान देण्यात आले आहे.

(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा उद्देश अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना सिंचनाच्या शाश्वत सुविधा निर्माण करणे असा असल्याने नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा लाभ न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात व विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात धान व कापूस या पिकांवरील किडीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

**(३)***८५८ **श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी विशेषत: बल्लारपूर, पोंभुर्णा व मुल (जि.चंद्रपूर) येथे लष्करी अळी व मावा (किटक) या किडीमुळे धान व कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांत शेतकऱ्यांकडून वारंवार मागणी करुनही त्यांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मा.कृषी मंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या किडींवर नियंत्रण मिळविणे तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर, मुल, सावली, बल्लारपूर, चिमुर, नागभिड, सिंदेवाही, राजुरा, गोंडपिंपरी, पोंभुर्णा या तालुक्यात धान पिकाचे लष्करी अळीच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कीड रोग नियंत्रणाकरिता व्यापक प्रमाणावर प्रचार-प्रसिद्धी करण्यात आली आहे. कृषि विज्ञान केंद्रातील वरिष्ठ शास्त्रज्ञ, सिंदेवाही यांच्यासमवेत पाहणी करण्यात येवून पिक सल्ला देण्यात आलेला आहे. तसेच कृषि विभागामार्फत क्रॉपसॅप योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावरील किटकनाशकांचा पुरवठा करुन किडींचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यात आला आहे. तसेच, प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सहभागी शेतकऱ्यांना हंगामा अखेर पीक नुकसानीच्या प्रमाणात कापणी प्रयोग आधारीत नुकसान भरपाई देय राहील. तसेच, कीड/ रोगामुळे बाधित झालेल्या क्षेत्राकरीता आर्थिक मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी मदत व पुनर्वसन विभागास प्रस्ताव सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांतील नागरिकांना मुलभूत व पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(४) * १७७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी वाड्या अस्तित्वात असून तेथे अद्यापही मुलभूत व पायाभूत सोयी-सुविधांची कमतरता असल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण (जि.रायगड) येथील गंगावाडी या आदिवासी वाडीतील ३५ वर्षीय विटभट्टी कामगार श्री.नितेश दशरथ नाईक यांचा जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथे मृत्यू झाल्यानंतर रस्ता व इतर सोयी-सुविधाअभावी त्यांचा मृतदेह चादरीची झोळी करुन ग्रामस्थांना २ कि.मी अंतराच्या जंगलवाटेतून रात्रौ ११ वाजता आणावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी वाडीत स्मशानभूमी नसल्याने तेथील ग्रामस्थांना दगड रचून चौथरा तयार करुन त्यावर अंत्यसंस्कार करावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासींसाठी मोठ्या प्रमाणात निधी देऊनही अनेक आदिवासी वाड्यांत मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित आहेत व याबाबत ग्रामस्थांनी जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभाग, जिल्हाधिकारी, तहसिलदार यांना अनेकदा निवेदन देऊनही त्यांना कोणत्याही सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी वाड्यांना मुलभूत व पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासह यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्प कार्यालय पेण या कार्यक्षेत्रांतर्गत रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यांतर्गत एकूण १५ तालुक्यांचा समावेश असून त्यातील ६ तालुक्यांमधील १३४ गावांचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रात आहे. या गावांमध्ये वैयक्तिक तसेच सामूहिक स्वरुपाच्या योजना राबविल्या जातात.

आदिवासी घटक कार्यक्रमाखाली जिल्हा व राज्यस्तरावरुन ग्रामीण भागात पायाभूत सुविधांसाठी आदिवासी विकास विभाग खुद्द तसेच इतर प्रशासकीय विभाग जसे की, ग्रामविकास विभाग, पाणी-पुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, ऊर्जा विभाग इ. द्वारा विविध योजना राबविण्यात येतात.

आदिवासी विकास विभागाकडील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीत एकूण २२२ गावांमध्ये २५७ कामे मंजूर करण्यात आलेली असून त्यासाठी रु.९१४.५१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

(२) व (३) खरे आहे.

वरप-गंगावाडी रस्त्यासाठी असणारी जागा ही वन विभागाची आहे. तसेच गंगावाडी येथील स्मशानभूमीकरीता उपलब्ध असलेली जागा वन विभागाची असल्यामुळे सदर कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे. यासाठी सदर जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम, २००८ व सुधारित नियम, २०१२ अंतर्गत कलम ३ (२) अन्वये प्रस्ताव सादर करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) खरे नाही.

आदिवासी घटक कार्यक्रमाखाली जिल्हा व राज्यस्तरावरुन ग्रामीण भागात पायाभूत सुविधांसाठी आदिवासी विकास विभाग खुद्द तसेच इतर प्रशासकीय विभाग जसे की, ग्रामविकास विभाग, पाणी-पुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, ऊर्जा विभाग इ. द्वारा विविध योजना राबविण्यात येतात.

आदिवासी विकास विभागाकडील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना ही सामूहिक विकासाच्या सोयी-सुविधा निर्माण करणारी नियमित योजना आहे. सदर योजना ही आदिवासी उपयोजनाबाह्य क्षेत्रात आदिवासी लोकसंख्येनुसार विविध पायाभूत विकासकामे उपलब्ध करुन देण्यासाठी राबविण्यात येते.

सदर योजनेंतर्गत उपलब्ध निधीच्या मर्यादेत पात्र कामांना मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मच्छीमार बांधवांच्या अनेक सोसायट्यांना डिझेल परताव्याची रक्कम मिळाली नसल्याबाबत**

**(५) * १६४९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छीमार बांधवांच्या अनेक सोसायट्यांना जवळपास ९१ कोटी रुपये डिझेल परताव्याची रक्कम मिळाली नसल्याने पारंपारीक मासेमारी व्यवसाय धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मच्छीमार संस्थांनी डिझेल परताव्याची प्रकरणे सहाय्यक मत्स्यव्यवसाय अधिकारी यांच्याकडे सादर करुनही अद्याप त्यांच्यावर कार्यवाही न झाल्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती या योजनेंतर्गत सन २०२४-२५ आर्थिक वर्षाकरीता एकूण रु.१५०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत आहे. त्यापैकी रु.१२६.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. या वितरणानुसार मच्छिमारांना दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती होत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत**

**(६) * ७५० श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण),**

**श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक वनपरिक्षेत्रात विशेषत: चंद्रपूर, ब्रम्हपूरी, भंडारा, तुमसर, यवतमाळ, नागपूर, ताडोबा, गोंदिया, बल्लारशा, राजूरा इ. भागात मोठ्या प्रमाणात बिबटे व वाघांचे मृत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिकार, अवयवांची तस्करी, आजार, रेल्वे अथवा अन्य वाहन अपघात, विजेचा तारांचा धक्का, वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष तसेच रिक्त पदे इ. अनेक कारणास्तव वाघांच्या संख्येत घट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन बिबटे व वाघांचे मृत्यू रोखण्याबाबत तसेच यातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) दिनांक ०१.०१.२०२५ ते २०.०२.२०२५ या कालावधीत नागपूर, चंद्रपूर व यवतमाळ वनवृत्त तसेच पेंच व्याघ्र प्रकल्प व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत नैसर्गिक कारणामुळे-८, रेल्वे/रस्ते अपघातात-३ व शिकारीमुळे-४ अशा एकूण १५ वाघांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच दिनांक ०१.०१.२०२५ ते २०.०२.२०२५ या कालावधीत राज्यात रेल्वे/रस्ते अपघातामुळे-२१, नैसर्गिक कारणांमुळे-७ व अज्ञात कारणामुळे-४ अशा एकूण ३२ बिबट्यांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर वाघांच्या शिकारीच्या ४ प्रकरणांमध्ये एकूण १९ अरोपींना अटक करण्यात आली असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

वाघ व बिबट्यांच्या संरक्षणार्थ क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

• जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ / बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.

• विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सनियंत्रण करण्यात येते.

• अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.

• विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.

• अतिसंवेदनशिल क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

• जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी, निरीक्षण मनोरे व तपासणी नाके तयार करण्यात आले आहेत.

• मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.

• वन विभागातील अतिक्रमण, वन्यप्राण्यांची शिकार, वनवणवा इत्यादी गुन्ह्यांची माहिती प्राप्त होण्याकरीता १९२६ हा हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वयीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अवैधरित्या होत असलेल्या वाळू उपशाबाबत**

**(७) * १३ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.भीमराव केराम (किनवट), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड):** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र आधुनिक यंत्राद्वारे तसेच अवैधरित्या वाळू उपसा व वाढीव दराने विक्री होत असल्यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शासनाच्या विविध आवास योजनांना माफक दरात व मुबलक वाळू पुरवठा होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू उपसा व विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी टोल नाक्यांवरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासून अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कोट्यवधी रुपयांचा दंड आकारण्याच्या नोटीसा जिल्हाधिकाऱ्यांनी पाठवूनही अद्याप यावर कोणतेही नियंत्रण आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अवैध वाळू उपसा प्रकरणांमध्ये शासकीय अधिकाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे नवीन वाळू धोरण तयार करुन सर्वसामान्यांना ६०० रुपये प्रति ब्रास वाळू पुरवठा तसेच तहसिलदारांनी आपापल्या कार्यक्षेत्रात वाळूचे डेपो तयार करुन त्यामार्फत वाळू उपलब्ध करुन देण्याचा निर्णय स्थगित करण्याची वेळ शासनावर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन वाळू धोरण ठरविण्यासाठी नाशिकचे विभागीय आयुक्त, श्री.प्रविण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या अभ्यासगट समितीने माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेल्या अहवालावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन राज्यात अवैध वाळू उपसा, वाहतूक व विक्रीवर नियंत्रण आणून नागरिकांना व विविध घरकुल आवास योजनांना मुबलक व माफक दराने वाळू उपलब्ध करण्याबाबत तसेच यातील दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेली यादी संबंधित तहसिलदार यांनी तपासून तशी लेखी परवानगी दिल्यानंतर अवैध उत्खनन व वाहतूक कारवाया मध्ये जप्त केलेली वाळू तसेच वाळू डेपोतून विनामूल्य ५ ब्रासपर्यंत वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद धोरणात केली आहे.

त्यानुसार राज्यात सन २०२३-२४ मध्ये २४,११९ घरकुल लाभार्थ्यांना ८३,३३० ब्रास व सन २०२४-२५ मध्ये ३६६५९ घरकूल लाभार्थ्यांना १,६२,०२८ ब्रास वाळू उपलब्ध करुन दिली आहे.

दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत राज्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या ६१३१ प्रकरणी २९९.६१ कोटी रुपये दंडाची आकारणी करण्यात येऊन ५७.६० कोटी रुपये दंड वसूल केला आहे व प्रकरणी ६०२ गुन्हे दाखल करुन १९२ आरोपींना अटक केले आहे.

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती उपलब्ध करुन देणे व अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत रेती उत्खनन, साठवणूक व्यवस्थापन व ऑनलाईन विक्री करण्याबाबतचे सर्वंकष धोरणाच्या शासन निर्णय दिनांक १९.०४.२०२३ अन्वये एक वर्षासाठी प्रायोगिक तत्त्वावर स्वामित्वधनाची रक्कम माफ करुन संपूर्ण राज्यासाठी वाळू विक्रीची किंमत रु.६००/- प्रती ब्रास इतकी निश्चित केली होती.

सदर वाळू धोरणाच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणी व शासनावर पडणारा आर्थिक बोजा या बाबी विचारात घेऊन स्वामित्वधनाची रक्कम आकारुन ना-नफा-ना-तोटा या तत्त्वावर वाळू विक्रीची किंमत निश्चित करुन सुधारित वाळू धोरण निर्गमित करण्यात आले आहे.

राज्यातील नागरिकांना सहज सुलभतेने व माफक दरात वाळू उपलब्ध व्हावी तसेच, इतर राज्यांमधील वाळू धोरणांचा तुलनात्मक अभ्यास करुन सर्वसमावेश वाळू धोरण निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये नसून दिनांक ०८.०७.२०२४ रोजी समिती गठीत केली होती. सदर समितीने दिनांक ०५.०८.२०२४ च्या पत्रान्वये सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, डेपो-मार्फत वाळू उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अडचणी, डेपो पद्धती व लिलाव पद्धती यामधील गुण-दोष यांचा विचार करुन वाळू निर्गतीसाठी सर्वंकष सुधारित धोरण विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील वनविभागात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(८) * २४०५ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील वनविभागात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपवनसंरक्षक व विविध वनपरिक्षेत्र कार्यालयांनी आपल्या अधिकार क्षेत्राचा गैरवापर करुन तसेच निविदा प्रकाशित करण्यासंदर्भात अस्तित्वात असलेले नियम डावलून नियमबाह्य पध्दतीने कोट्यवधी रुपयांच्या निविदा सूचना परस्पर दैनिकांना देऊन प्रकाशित केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार हा अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नंदूरबार वन विभागामध्ये जलयुक्त शिवार अभियान २.० योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांपैकी एकूण ६७ कामांकरिता ई-निविदा माहे जानेवारी, २०२५ मध्ये दिनांक ०३.०१.२०२३ च्या शासन निर्णयात नमूद

सूचनांनुसार पंजीकृत असलेल्या वृत्तपत्रात व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.
(३) सदर ई-निविदा प्रक्रियेसंदर्भात विभागीय वन अधिकारी (दक्षता), धुळे यांच्यामार्फत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये कुठलीही अनियमितता झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी, अनुसूचित जमाती व वनवासी रहिवाशांना वितरित केलेल्या जमिनी दीर्घ भाडेपट्ट्याने धनिकांना देत असल्याबाबत**

**(९) *१७२५ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वन संपदेवर उपजीविका असलेल्यांना कायदेशीर अधिकार देणाऱ्या वनहक्क कायद्यामुळे राज्यातील सुमारे २ लाख आदिवासी, अनुसूचित जमाती व वनवासी रहिवाशांना लाखो हेक्टर जमिनीचे सातबारा उतारे वितरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा आदिवासी पट्टेधारकांचा अशिक्षितपणा, खोटे गुन्हे, धमक्या, विविध प्रलोभने, फसवणूक इ. प्रकारांचा वापर करुन धनिकांकडून त्यांच्या जमिनी बळकाविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगर नजिकच्या विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, पनवेल, नाशिक व नागपूर येथील जमिनी दीर्घ मुदतीचे भाडे करार करुन त्या जमिनींवर शेतघर, रिसॉर्ट, मत्स्यशेती, वाळू उत्खनन असे अनेक अवैध प्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी अनेक ठिकाणी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अशा सर्व जमिनींची फेरतपासणी करुन आवश्यकती उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

अनुसूचित जमाती व अन्य पांरपारिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ अंतर्गत विविध जिल्ह्यात अंदाजे १,९३,९८९ दावे मंजूर करण्यात आले आहेत. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एस-१०/२०११/प्र.क्र.१७५/फ-३, दिनांक ०२.०१.२०१२ अन्वये सूचित केल्याप्रमाणे याबाबतची नोंद ७/१२ मध्ये इतर हक्कात घेण्यात येते.
(२) हे खरे नाही. अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) अंशत: खरे आहे. ठाणे जिल्ह्यातील मत्स्यशेतीचे प्रकरण वगळता अन्य जिल्ह्यात अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) मत्स्यशेती करण्यात येणाऱ्या मत्स्यतलाव धारक यांच्यावर मत्स्य विभाग व अन्य विभाग यांच्याकडून संयुक्त कारवाई करुन मत्स्य तलाव नष्ट करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड-गोरेगाव पूर्वेकडील दिंडोशी डोंगरावर लागलेल्या वणव्याबाबत

**(१०) * ११५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड-गोरेगाव पूर्वेकडील पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या दिंडोशीच्या डोंगरावर रात्रौ ११ नंतर आग लागून वणवा पेटल्याची घटना दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात सुरक्षा रक्षक असतानाही सन २०२१ व २०२२ मध्ये नऊ व सहा वेळा डोंगरावर आग लागण्याच्या घटना घडल्याने विकासकांना विकास करण्यासाठी भूखंड उपलब्ध व्हावा, याकरिता वनसंपत्तीला आग लावण्याचे प्रकार सतत घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आगीच्या घटनांची चौकशी करण्यासाठी वनशक्ती या संस्थेचे संचालक स्टॅलीन दयानंद यांनी वन विभाग, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे लेखी तक्रारी करुनही दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन आगींच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) मौजे मालाड न.भू.क्र.८२७/अ/४अ/१ आणि न.भू.क्र.८२७/अ/४अ/२ मधील मे.डी.बी. रिअल्टी लि. व मे. फेरानी हॉटेल्स यांच्या खाजगी क्षेत्रावर दिनांक २८.१२.२०२४ रोजी वणवा लागला होता.

(२) मुंबई अग्निशमन दलाच्या दिनांक २८.०२.२०२५ रोजीच्या चौकशी अहवालात नमूद केल्याप्रमाणे, सन २०२१ मध्ये ८ वेळा सन २०२२ मध्ये ८ वेळा दिंडोशीच्या डोंगरावर आगी लागलेल्या होत्या. त्या सर्व आगी ह्या किरकोळ व छोट्या स्वरुपाच्या होत्या. १६ आगींपैकी १५ आगींचे कारण पेटती सिगारेट/बिडी निष्काळजीपणे टाकल्यामुळे व एक आग ही फटाक्यांच्या ठिणगीमुळे लागली आहे.

(३) व (४) वनशक्ती या संस्थेचे संचालक स्टॅलीन दयानंद यांची ई-मेल द्वारा तक्रार प्राप्त झाली आहे. तथापि, सदर क्षेत्र हे वनेत्तर नागरी क्षेत्र असल्याने वन विभागाचा महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ व भारतीय वन अधिनियम, १९२७ लागू होत नाही. वणवा लागलेले क्षेत्र हे खाजगी क्षेत्र आहे. तसेच या क्षेत्राच्या लगत प्रादेशिक वनविभागाचे क्षेत्र नाही. तरी, या क्षेत्रातील आगींच्या नियंत्रणाकरीता क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात वन विभागामध्ये मृद व जलसंधारणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(११) * ३८०० श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात वन विभागामध्ये मृद व जलसंधारण कामाच्या नावाखाली सुमारे ३५ कोटींची निकृष्ट दर्जाची कामे करुन गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणात वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

सातारा वन विभागास सन २०२३-२४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रु.६४७.१४ लक्ष, कॅम्पा योजनेंतर्गत रु.४८.७७ लक्ष व सन २०२४-२५ करिता रु.१४२.३६ लक्ष असा एकूण रु.८३८.२७ लक्ष प्राप्त झालेला सर्व निधी खर्च करण्यात आलेला आहे. सदरची कामे अंदाजपत्रकीय बाबींप्रमाणे गुणवत्ता व दर्जा राखून पूर्ण करण्यात आली असून अमृत सरोवर योजनेच्या कामांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तांत्रिक तपासणी देखील करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(१२) * ११९३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सई डहाके (कारंजा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये सन २०२३ व २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, गारपीट व अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झाली असून शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे व फळबागांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेल्या जिवित व वित्तहानी तसेच शेती पिकांच्या नुकसान प्रकरणी अद्यापही अनुदान वा आर्थिक मदत शेतकऱ्यांना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे न होणे, पंचनामे वस्तुनिष्ट नसणे, सदोष पर्जन्यमापक यंत्रणेमुळे पावसाची नोंद योग्य पध्दतीने न होणे, अनुदानाच्या निकषांमध्ये क्षेत्रनिहाय तफावत आढळणे, काही जिल्हे अनुदानातून वगळणे, केवायसी करुनही बँक खात्यात रक्कम जमा न होणे तसेच वीज पडून झालेले मृत्यू इ. अनेक कारणास्तव शेतकरी या मदतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी नुकसान भरपाई मिळण्याबाबत बाधित शेतकरी, ग्रामस्थ, वारसदार व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी मागणी करुनही याची अद्यापही अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी, गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत ग्रामस्तरावर महसूल, ग्रामविकास विभाग व कृषि विभागाच्या सर्वेक्षण व संयुक्तिक वस्तुनिष्ठ पंचनामे नुसार सन २०२३ व २०२४ या कालावधीसाठी निधी मागणीचे प्रस्ताव

शासनास सादर केल्यानुसार शासनाने सन २०२३ व २०२४ करिता विविध शासन निर्णयानुसार निधी मंजूर केलेला आहे. त्या अनुषंगाने E-KYC झालेल्या शेतकऱ्यांना डीबीटी प्रणालीद्वारे निधी वितरित करण्यात येत आहे. काही ठिकाणी DBT प्रणालीवर माहिती क्षेत्रीय यंत्रणेमार्फत भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्याने वितरण बाकी आहे.

मनुष्यहानी, पशुहानी व अतिवृष्टी/पुरामुळे घरात पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीबाबत राज्य आपत्ती निधीच्या दरानुसार उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातुन रक्कम आहरित करण्यासाठी मान्यता दिल्यानुसार निधी विभागीय कार्यालयाकडून वितरित केला जातो.

काही शेतकऱ्यांचे बँक खाते आधारकार्ड संलग्न नसल्यामुळे, सामाईक खातेदारांचे अनुदान कोणाच्या खात्यावर जमा करावे याबाबतचे संमतीपत्र दिले नसल्याने, मयत खातेदारांची वारस नोंद झाली नसल्याने तसेच परगावाच्या खातेदारांचे बॅक तपशील, आधारकार्ड इ. माहिती उपलब्ध होत नसल्याने अनुदान वाटपास विलंब होत आहे.

तथापि, याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामखेडा (जि.नाशिक) परिसरात कांद्यावरील किडीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१३) * ७१६ श्री.मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी विशेषत: खामखेडा परिसरात ढगाळ हवामान, धुके, रिमझिम पाऊस व रोगट वातावरणामुळे कांद्यावर मावा (किटक) व तुडतुडे रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वातावरणातील बदलांमुळे पिकांवर पडणाऱ्या रोगांवर विभागामार्फत औषध फवारणी करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कांदा पिकांवरील रोगांचा प्रादुर्भाव रोखणे तसेच शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही,

नाशिक जिल्ह्याचे सन २०२४-२५ चे आजअखेर रब्बी उन्हाळी हंगामाचे लागवड क्षेत्र २४८२०३ हेक्टर आहे. सद्य:स्थितीत कांदा पिकाची वाढ पूर्ण झाली असून कांदा पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे. नाशिक जिल्ह्यातील विशेषतः खामखेडा परिसराची कांदा पिकाची पिक परिस्थिती समाधानकारक आहे. तसेच कांदा पिकाची क्षेत्रीय स्तरावरुन कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून घारापूरीकडे जाणाऱ्या निलकमल या प्रवासी बोटीला नौदलाच्या स्पीड बोटीने धडक दिल्याबाबत

**(१४) * ८२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून घारापूरीच्या दिशेने निघालेल्या निलकमल लाँचला (प्रवासी बोटीला) नौदलाच्या स्पीड बोटीने धडक दिल्याने १५ जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुर्घटनेस जबाबदार असलेल्या संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच जखमींना व मृत प्रवाशांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच अशा घटनांची पुनर्रावृत्ती होऊ नये, याकरिता कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) व (२) नौदलाच्या स्पीड बोटीची जोरात धडक बसल्याने एम एल नीलकमल-१ या प्रवासी बोटीतील व नौदलाच्या स्पीड बोटीतील एकूण १५ व्यक्ती मृत व ०२ प्रवासी गंभीर जखमी झाले होते व ९८ प्रवासी यांना भारतीय तटरक्षक दल, जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण, मुंबई बंदर प्राधिकरण, सीआयएसएफ, भारतीय नौदल, पोलीस विभाग व इतर खाजगी बोटीने वाचविण्यात आले.

कुलाबा पोलीस ठाणे यांनी या अपघाताचा FIR नोंदविला असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. नौदल विभागाकडून अपघाताची स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाकडून अपघाताच्या कारणाची चौकशी करण्याकरिता मुख्य बंदर अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली असून सदर समितीकडून चौकशी सुरु आहे.

इनलँन्ड व्हेसल ॲक्ट १९१७ आणि महाराष्ट्र मायनर पोर्टस् (पॅसेंजर व्हेसल्स) नियम, १९६३ मध्ये नमुद तरतुदीनुसार प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक केल्यामुळे संबंधित मालक आणि चालक यांचेकडून नियमानुरुप दंड वसूली करण्यात आलेली आहे. तसेच एम एल नीलकमल-१ या बोटीचे नोंदणी प्रमाणपत्र, सर्व्हेप्रमाणपत्र, प्रवासी परवाना आणि बोटीवर कार्यरत मास्टरचे सक्षमता प्रमाणपत्र निलंबित करण्यात आलेले आहे.

(३) दुर्घटना बाधित १० मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रक्कम रु.०५ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित व्यक्तींचे वारसा चौकशी अहवाल प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मृत / जखमी व्यक्तींच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत वितरित करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रवासी वाहतूक करीत असताना घ्यावयाची खबरदारी यासंदर्भात सर्व बोट ऑपरेटर यांना महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत परिपत्रकाद्वारे सक्त सूचना दिलेल्या आहेत. गेटवे ऑफ इंडिया येथील प्रत्येक जेट्टीवर महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे जवान तैनात करण्यात आलेले असून त्यांच्याकडून प्रवासी बोटीत प्रवासी क्षमतेइतकी प्रवासी वाहतूक होत असल्याची खात्री केली जात आहे. तसेच बोटीत बसण्याआधी प्रत्येक प्रवाशाला लाईफ जॅकेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या चौकशी अहवालाअंती अधिकची प्रवासी सुरक्षा उपाययोजनांची मार्गदर्शक तत्त्वे (SOP) बनविण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात व विशेषत: नागपूर जिल्ह्यातील तूर उत्पादकांना भाववाढ मिळण्याबाबत

**(१५) * ४७४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व विशेषत: नागपूर जिल्ह्यात गतवर्षी कमी पर्जन्यमान, बुरशीजन्य व मर रोगांचा प्रादुर्भाव, धुक्याचा परिणाम इ. अनेक कारणांमुळे तुरीच्या उत्पादनावर मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी तूर पिकाला कमी भाव मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तूर उत्पादक शेतकऱ्यांना भाववाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राज्यातील एकूण उत्पादन क्षेत्र व उत्पादकता यांच्या आधारे हमीभाव घोषित करण्यात येतात.

हंगाम २०२४-२०२५ मध्ये केंद्र शासनाने किमान आधारभूत योजनेंतर्गत तूर पिकासाठी रु.७५५०/- प्रति क्विंटल प्रमाणे हमीभाव जाहीर केलेला आहे.

राज्यात दिनांक २४ जानेवारी, २०२५ पासून तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ पासून खरेदी सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात तूर खरेदीसाठी नाफेडद्वारे ३७३ व एनसीसीएफद्वारे १२५ अशी एकूण ४९८ खरेदी केंद्र कार्यन्वित करण्यात आली आहेत. दिनांक २४/०२/२०२५ अखेर राज्यात २९२५४ शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून १६१ शेतकऱ्यांकडून १८१३.८६ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली असून खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बार्टी, सारथी व महाज्योतीच्या पी.एच.डी. संशोधक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * ४४ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती):** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सारथी, बार्टी, महाज्योतीच्या पी.एच.डी.संशोधक विद्यार्थ्यांना १०० टक्के फेलोशिप देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने घेवूनही अद्याप त्याची प्रभावी अंलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे अनेक विद्यार्थी या अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन तात्काळ निधीची तरतूद करुन सर्व विद्यार्थ्यांना तातडीने फेलोशिप देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी बार्टीमार्फत एकूण पात्र ७६३ विद्यार्थ्यांपैकी प्रगती अहवालानुसार ३९९ विद्यार्थ्यांना पीएचडी नोंदणी दिनांकापासून प्राप्त प्रगती अहवालानुसार अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात आली आहे. महाज्योतीमार्फत एकूण पात्र ९०१ विद्यार्थ्यांपैकी सहामाही संशोधन अहवाल सादर केलेल्या विद्यार्थ्यांना रु.९.३३ कोटी इतका निधी वितरित केला आहे. तसेच, सारथीला ९६९ विद्यार्थ्यांपैकी ८३३ विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती अदा करण्यासाठी जून, २०२४ पर्यंत अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६५५ विद्यार्थ्यांचे अर्ज तपासले असून ३२४ विद्यार्थ्यांना रक्कम रु.२४.८६ कोटी अधिछात्रवृत्ती अदा करण्यात आली आहे. तसेच उर्वरित ३३१ अर्जदारांचे वित्तीय आदेश तयार करण्याची प्रक्रिया सुरु असून १७८ अर्ज तपासणी व विद्यार्थी स्तरावर त्रुटीपूर्ततेकरिता प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात खरीप व रब्बी हंगामातील पिकांची ई-पीक पाहणी बंधनकारक करण्याबाबत

**(१७) * २०९५ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजीत कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप व रब्बी हंगामात पीक पाहणी करण्याचे आवाहन केले जात असूनही यंदाच्या रब्बी हंगामात ११.४२ टक्के क्षेत्राची ई-पीक नोंद केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात विशेषतः धाराशिव जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामातील पिकांची ई-पीक पाहणी न झाल्यामुळे अनेक शेतकरी सोयाबीन, कापूस अनुदान व इतर शासकीय योजनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शेतकऱ्याकडून ई-पीक पाहणी न झाल्यास महसूल प्रशासनाने उर्वरित शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या दुर्लक्षामुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना अनुदान व इतर योजनाचा लाभ मिळावा व महसूल प्रशासनाकडून १००% ई-पीक पाहणी करून घेण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

राज्यात खरीप + संपूर्ण वर्ष हंगामामध्ये एकूण सर्वसाधारण पेरणी क्षेत्राच्या ९९.३८ % क्षेत्रावर पीक पाहणी नोंद झाली आहे. तसेच रब्बी हंगामामध्ये एकूण सर्वसाधारण पेरणी क्षेत्राच्या ८१.०९ % क्षेत्रावर पीक पाहणीची नोंद झालेली आहे.

रब्बी हंगामात सर्वसाधारणपणे राज्यातील सर्व लागवडीलायक क्षेत्रामध्ये पीक पाहणी नोंद होत नाही. लागवडीलायक क्षेत्रासोबत रब्बी हंगामातील पिकांची टक्केवारी ही सन २०२४-२५ मध्ये २८.६७% आहे. सदरची टक्केवारी ही रब्बी हंगामाकरीता साधारणपणे ३०% पर्यंतच असते.

सदर आकडेवारी पाहता यावर्षी झालेली पीक पाहणी ११.४२% झाली असल्याचे म्हणणे खरे नाही.

(२) होय, अंशत: खरे आहे.

राज्यस्तरावर अशा तक्रारी प्राप्त नाहीत. तथापि, धाराशिव जिल्ह्याच्या बाबतीत हे अंशत: खरे आहे. सन २०२३-२४ खरीप हंगामामध्ये धाराशिव जिल्ह्यामध्ये खरीप सर्वसाधारण पेरणी क्षेत्र ५०४७३५.५४ हे. आर. पैकी

४८९९२७.२७ हे. आर. एकूण पीक पाहणी करण्यात आलेली आहे म्हणजे जिल्ह्यामध्ये ९७.०७ टक्के ई-पीक पाहणी झालेली आहे. उर्वरित पेरणी क्षेत्र १४८०८.२७ हे. आर. क्षेत्रावर ई-पीक पाहणी झालेली नसल्याचे दिसुन येते.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.४५/ ४-अ, दिनांक २९ जुलै, २०२४ अन्वये राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई पीक पाहणी ॲप/पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरीता पात्र राहतील, असे नमुद आहे. त्यामुळे www.scagridbt.mahait.org पोर्टलव्दारे जिल्ह्यातील पात्र झालेल्या एकुण ४२९४९६ शेतकऱ्यांपैकी ३७८५१२ शेतकऱ्यांना रु.१५६.६५ कोटी रुपये अर्थसहाय्य वितरित करण्यात आलेले आहे. ५०९८४ प्रलंबित शेतकरी यांना अनुदान वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(३) होय, हे खरे आहे.

रब्बी सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र राज्याने केंद्राच्या ॲग्रीस्टॅक या संकल्पनेचा अंगीकार केला आहे. त्यानुसार, संपूर्ण लागवडीखालील क्षेत्राची पीक पाहणी करणे आवश्यक आहे. जनजागृती आणि अंमलबजावणी यंत्रणा यांची तजवीज करुन रब्बी सन २०२४-२५ पासून ही बाब लागू करण्यात आली आहे.

(४) केंद्र शासनाच्या ॲग्रीस्टॅक या संकल्पने अंतर्गत ई-पीक पाहणी प्रणाली अद्यावत करून डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) ही प्रणाली राबविण्यात येते. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मस्यव्यवसाय विभाग कडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.१५७/१०अे, दिनांक १४/१०/२०२४ अन्वये लागवडीखालील क्षेत्राची पीक पाहणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार १००% पीक पाहणी करण्याची प्रक्रिया ही रब्बी सन २०२४-२५ (डिसेंबर, २०२४ ते मार्च, २०२५) या कालावधीत राज्याने पहिल्यांदाच लागू केली आहे. त्यादृष्टीने १०० % पीक पाहणी करण्याकरीता पीक पाहणी सहायक यांची नेमणूक ग्रामस्तरावर करण्याच्या सूचना दिनांक १४/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जमाबंदी आयुक्त कार्यालयामार्फत सर्व विभागीय आयुक्त यांना देण्यात आल्या आहेत.

(५) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/ प्र.क्र.४५/ ४-अ, दिनांक २९ जुलै, २०२४ अन्वये राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई पीक पाहणी ॲप/पोर्टलद्वारे कापुस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरीता पात्र राहतील, असे नमुद आहे. त्यामुळे www.scagridbt.mahait.org पोर्टलद्वारे धाराशीव जिल्ह्यात पात्र ठरलेल्या मात्र अर्थ सहाय्यापासून प्रलंबित असलेल्या एकूण ५०९८४ शेतकऱ्यांच्याबाबतीत अर्थसहाय्य वाटपास विलंबाची कारणे पुढील प्रमाणे आहेत.:-

१) मयत -३७७५,

२) अज्ञान पालक कर्ता- १५९६,

३) संपर्क होत नाहीत असे-११५५३,

४) संमती देण्यास इच्छुक नसलेले-४९०२,

५) एक गुंठयापेक्षा कमी क्षेत्र / एकाच उताऱ्यावर २० पेक्षा जास्त खातेदार असलेले-९७१,

६) शहरी भागात राहत असलेले -६७४२

७) विवाहीत महिला-९९८

असे एकूण ३०५३७ शेतकरी आहेत व या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी कार्यवाही सुरु असुन त्यासाठी शासन तसेच जिल्हास्तरावरुन वेळोवेळी प्रसिध्दीपत्रक जारी करण्यात आले आहे. तसेच २०,४४७ पात्र शेतकरी यांना अर्थसहाय्य वितरीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच, ई-पीक पाहणी न झालेल्या १४८०८.२७ हे. आर. पेरणी क्षेत्रापैकी कापूस व सोयाबीन लागवड केलेल्या शेतकऱ्यांची माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न सुरु आहे.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल-अकुशल काम करणाऱ्या आदिवासी मजुरांना मजूरी मिळत नसल्याबाबत

**(१८) * १४६१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्रीमती श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.विलास तरे (बोईसर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल-अकुशल काम करणाऱ्या मजुरांना गत १ वर्षापासून मजूरी न मिळाल्याने ते आर्थिक संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत १०० दिवस कामाची हमी व १५ दिवसांच्या आत मजूरी अदा करण्यासंदर्भात कायद्यात तरतूद असतानाही त्याची राज्यात अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहयो मजुरांच्या मजूरीचे सुमारे ६१४.४० कोटी रुपये केंद्र शासनाकडे प्रलंबित असून राज्य शासनाकडूनही या प्रकरणी निधी देण्यात आला नसून अनेक ठिकाणी या योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची देयके देखील प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रोहयो अंतर्गत मिळणारी मजूरी अत्यल्प असून ती देखील न मिळणे परिणामी मजूरीअभावी मजुरांचे मोठ्या प्रमाणात अन्य जिल्ह्यात वा राज्यांमध्ये स्थलांतर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. मजुरांची मजूरी केंद्र शासन मजुरांच्या खात्यात NeFMS द्वारे जमा करीत असते.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) दिनांक ०१.०१.२०२५ पासून १०.०२.२०२५ पर्यंतच्या कालावधीचे मजुरीची रु.४८३.८९ कोटीची प्रदाने केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत व याबाबतचा पाठपुरावा केंद्र शासनाकडे सुरु आहे.

-----------------

## राज्यात शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी बनावट जात प्रमाणपत्र सादर केल्याबाबत

**(१९) * ८९५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी),**

**श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने राज्यात दौरा करुन केलेल्या पाहणी दरम्यान आदिवासींच्या राखीव जागांवर झालेल्या भरतीचा आढावा घेण्यासाठी २७८४३ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे तपासली असता त्यातील जवळजवळ १७७९ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे बोगस असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणात राखीव असलेल्या ९५४१९ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे तपासली असता जवळजवळ ३७०७ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे बोगस असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागांवर बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी व शैक्षणिक प्रवेश मिळविल्यामुळे मुळ आदिवासींवर अन्याय झाला असून यासंबंधीचा सविस्तर अहवाल सादर करुन दोषींवर कारवाई करण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बोगस जातप्रमाणपत्र प्रकरणांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यासह अशाप्रकारचे बनावट दाखले देण्यावर निर्बंध आणण्यासाठी या प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) होय.

(३) दिनांक १०.०१.२०२५ रोजीच्या महाराष्ट्र टाइम्स या दैनिक वृत्तपत्रामध्ये "खोटे प्रमाणपत्र, कारवाईची मागणी" या मथळयाखाली राज्यात खोट्या जात प्रमाणपत्रधारकांनी अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या असून अन्य जाती आरक्षणाचा लाभ गैरमार्गाने मिळवत आहे. राज्यातील जात प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रकीयेत सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता असून खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही सक्त कारवाई व्हायला हवी, असे सक्त निर्देश राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने राज्य सरकारला दिले" अशी बातमी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) मा.राष्ट्रपती यांच्या मान्यतेने "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३)" व महाराष्ट्र शासनाने सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ पारित केले आहेत.

सदर अधिनियम, २००० मधील कलम १३ (१) या अधिनियमान्वये, सक्षम प्राधिकाऱ्याची कामे पार पाडणारी जी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी, हेतुपुरस्सर जातीचे खोटे प्रमाणपत्र देईल त्या व्यक्तीस अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु, दोन वर्षापर्यंत असु शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील अशी तरतूद आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीचे/जमातीचे प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी शासन निर्णय दिनांक १४/०१/२०१९ अन्वये श्री.पी.व्ही.हरदास, सेवानिवृत्त न्यायाधीश, मा.मुंबई उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांच्या दिनांक २०/०५/२०१९ रोजीच्या शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये, "मा.सर्वोच्च न्यायालयाने कु.माधुरी

पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सध्या अस्तित्वात असलेली कार्यपध्दती व यंत्रणा यामध्ये कोणताही व्यत्यय आणण्याची वा पर्यायी यंत्रणा सुचविण्याची आवश्यकता नसल्याचे" स्पष्ट केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती येथे संत्रा बागांचे सर्व्हेक्षण करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२०) * १२४९ श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात संत्रा पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून, संत्र्यावर संशोधन करण्यासाठी केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था तसेच डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत स्वतंत्र उद्यानविद्या विभाग सुरु करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त यंत्रणांकडून संत्रा फळ बागायतदारांच्या पिकांची पाहणी करुन त्यांना वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन वा उपाययोजना सुचविणे आवश्यक असतांना त्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले वा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोर्शी-वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील संत्रा फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी कृषी विभाग, कृषी विद्यापीठ व केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन केंद्र (नागपूर) यांनी कोणतीही उपाययोजना व मार्गदर्शन काही वर्षांपासून केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संत्रा फळबागांची पहाणी करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे तसेच संत्रा बागांचे सर्व्हेक्षण करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) होय.

सन १९८५ मध्ये नागपूर येथे केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. तसेच डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे सन १९६९ मध्ये उद्यानविद्या विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

संत्रा फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी कृषि विभागामार्फत फलोत्पादन पिकावरील कीडरोग सर्वेक्षण सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) योजना अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात कीड/रोग नुकसान पातळी ओलांडलेल्या गावात वेळोवेळी ॲडव्हायझरी प्रसिध्द केलेल्या आहेत.

तसेच अखिल भारतीय समन्वय संशोधन प्रकल्पातंर्गत संत्रा फळगळ नियंत्रणासंदर्भात फळपीक नियोजनाचे बहारानुरुप मासिक वेळापत्रक (SOP) व कीड व रोग व्यवस्थापनासाठी मासिक मार्गदर्शक शिफारशी तयार करुन कृषि विभागाद्वारे शेतकऱ्यांकरीता प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. तसेच या प्रकल्पातंर्गत मागील ३ वर्षात ३०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी देण्यात आल्या आहेत.

अमरावती जिल्ह्यात शेतीशाळांमधून लिंबूवर्गीय फळपीक लागवड तंत्रज्ञान, पाणी व खत व्यवस्थापन, फळगळीचे कारणे व उपाययोजना, कीड/रोग कारणे व उपाययोजना, अंबिया व मृगबहार व्यवस्थापन, हवामान धोके व विमा संरक्षण इ. बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहेत.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फळगळ नियंत्रणाच्या दृष्टीने वाढ संजीवके, बुरशीनाशके, फ्रुट फ्लायट्रॅप व सुक्ष्म मुलद्रव्ये इ. निविष्ठांचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात आलेला आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सन २०२३ मध्ये सततच्या अवकाळी पावसामुळे झालेल्या फळगळीसंदर्भात ४१९११ शेतकऱ्यांना रु.१३४.६२ कोटी मदत वितरित करण्यात आली आहे.

मार्च, २०२४ ते ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत अवकाळी पाऊस, सततच्या पावसामुळे झालेली फळगळ इ. कारणास्तव झालेल्या नुकसानीकरीता एकूण ९८०७३ शेतकऱ्यांना (संत्रा फळगळ नुकसानीकरीता प्राप्त रु.१३४.६२ कोटीच्या मदतीसह) एकूण रु.२९५.६४ कोटी मदत वितरित करण्यात आली आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०१.०१.२०२४ अन्वये अवेळी पाऊस व गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतपीकांच्या नुकसानीकरीता बाधीत शेतकऱ्यांना राज्यआपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर मदत करण्याकरीता, ३ हेक्टरची मर्यादा न लावता नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी केलेली आहे. यासंदर्भात वरुड तालुक्यातील संत्रा फळबागांच्या झालेल्या नुकसानीकरीता अनुदान वितरित करावयाच्या मागणीबाबतचा प्रस्ताव उचित निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे, असे मदत व पुर्नवसन विभागाने कळविले आहे.

-----------------

## राज्यातील शेतकरी केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या ठिबक व तुषार सिंचनाच्या अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(२१) * ११४९ श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मनोज घोरपडे (कराड उत्तर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: सोलापूर व सांगली जिल्ह्यात लाखो शेतकरी केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचनाच्या अनुदानापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदानाअभावी शासनाच्या ठिबक व तुषार सिंचन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसून फळबागायतदार व अन्य शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठिबक सिंचनाचे अनुदानाबाबतचे लाखो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले असूनही अद्याप त्यावर निर्णय घेण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान तातडीने अदा करण्याबाबत व याकामी दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पिक योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेत निधीची तरतूद केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० टक्के प्रमाणात आहे. केंद्र शासनाकडून योजनेसाठी निधी प्राप्त

होताच त्याच्या समरुप राज्य हिश्याची तरतूद करुन आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयास निधी वितरणाकरिता उपलब्ध करुन देण्यात येतो व त्यांचे स्तरावरुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

सन २०२४-२५ मध्ये प्रति थेंब अधिक पिक या योजनेसाठी केंद्र शासनाकडून ३ हप्त्यात प्राप्त निधी व त्यास अनुसरुन राज्य शासनाचा समरुप हिस्सा असा एकूण रु.५६०.०४ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

सन २०२४-२५ या वर्षात सांगली जिल्ह्यासाठी रु.१०.१६ कोटी निधी उपलब्ध करण्यात आलेला असून २५८२ एवढ्या लाभार्थ्यांना रु.६.९९ कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. सन २०२४-२५ या वर्षात सोलापूर जिल्ह्यासाठी रु.२०.२८ कोटी निधी उपलब्ध करण्यात आलेला असून ४९०८ एवढ्या लाभार्थ्यांना रु.१६.६५ कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) येथील चार आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहारात निकृष्ट दर्जाच्या भाज्यांचा पुरवठा केल्याबाबत

**(२२) * ११९ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील दुर्गम भागातील चाफेवाडी, डोंगरपाडा, पिंगळस, भालीवडी या चार आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारात सडक्या व नासक्या भाज्यांचा पुरवठा व वापर करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना सडका भाजीपाला पुरवठा होत असल्याची लेखी तक्रार श्री.नितीन सावंत यांनी आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे करुनही अद्याप या प्रकरणी संबंधितांविरुध्द कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कंत्राटदार व विभागाचे संबंधित अधिकारी यांचे संगनमत असून कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना दर्जेदार पोषण आहाराचा पुरवठा करण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) कर्जत (जि.रायगड) येथील चाफेवाडी, डोंगरपाडा, पिंगळस, भालीवडी या चार शासकीय आश्रमशाळेमध्ये सडक्या, नासक्या भाज्यांचा पुरवठा केला जात असल्याबाबत "दैनिक सामना" वर्तमानपत्रात दिनांक ०६.०१.२०२५ रोजी बातमी प्रसिद्ध झाली होती. तसेच यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधीकडून देखील तक्रार प्राप्त झाली होती.

(४) वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, प्रकल्प अधिकारी, पेण यांच्या अंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळेमध्ये संबंधित पुरवठादार संस्थेकडून दिनांक ०७.१२.२०२४ पासून भाजीपाला पुरवठा सुरु झालेला आहे. सदरचा पुरवठा प्रथमतः खराब किंवा काही भाजीपाला चांगल्या दर्जाचा नसल्याचे आढळून आल्याने सदरील भाजीपाला त्यावेळी मुख्याध्यापक / अधिक्षकांनी न स्विकारता परत केला व

चांगल्या दर्जाचा भाजीपाल्याचा पुरवठा करणेबाबत पुरवठादार संस्थेला सूचित केले. तद्नंतर संबंधित पुरवठादार संस्थेमार्फत या शासकीय आश्रमशाळांना चांगल्या दर्जाचा भाजीपाला पुरवठा होत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात काही जिल्ह्यांत वन्यप्राण्यांचे पशु व मानवांवर हल्ले वाढत असल्याबाबत**

**(२३) * ३०४ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्रीमती मंजुळा गावित (साक्री), श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.मनोज घोरपडे (कराड उत्तर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय देरकर (वणी), श्रीमती नमिता मुंदडा (केज):** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये बिबट्या, वाघ, हत्ती, गवा, अस्वल, कोल्हे, रानकुत्रे, रानडुक्कर तसेच माकडे इ. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात पशुधनाची हानी व नागरिकांचे मृत्यू होत असून शेती पिकांचे देखील नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राण्यांची नसबंदी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचा निर्णय मा.वने मंत्री महोदयांनी दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी जाहिर केला असून त्याच्या अंमलबजावणी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, वन विभागात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त व अपुरा कर्मचारी वर्ग तसेच आवश्यक ती साहित्य सामुग्री, वाहने व रेस्क्यु किटअभावी यावर नियंत्रण आणण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आर्टिफिशल इंटेलिजन्स, आधुनिक तंत्राचा कॅमेरा वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन राज्यात होणारे वन्य प्राण्यांचे हल्ले रोखणे, रिक्त पदे भरणे, आवश्यक साहित्य पुरविणे, टास्कफोर्स नेमणे तसेच यात झालेल्या जिवित व वित्तहानीसंदर्भात तात्काळ आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) राज्यात सन २०२४-२०२५ (दिनांक २७.०२.२०२५ पर्यंत) मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ६१ व्यक्तींचा मृत्यू झाल्याच्या, ६४८ व्यक्ती जखमी झाल्याच्या, ४५७५ पशुधन मृत्यू झाल्याचा व १२३२९ पशुधन जखमी झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. तसेच पिक नुकसानीच्या ९४०५६ घटना निदर्शनास आल्या आहेत.
(२) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम १२ अन्वये प्रायोगिक तत्त्वावर जुन्नर वन विभागातील ऊस पिकामध्ये वास्तव्य करणाऱ्या बिबट्यांना जेरबंद करुन नसबंदी करण्याचा प्रस्ताव माहे डिसेंबर, २०२४ मध्ये केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

वन विभागातील काही विभागांमध्ये पदे रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे. तथापि, साहित्य सामुग्री, वाहने व रेस्क्यू किट यांचा अभाव नाही.

(४) मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रीय अधिकारी व कर्मचा-यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करुन पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरिकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे, यासाठी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असुन त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, निर्धुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.
- हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले कमी करण्यासाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काही ठिकाणी केला जात असून भविष्यात मोठ्या प्रमाणात वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याकरीता अर्थसंकल्प निधी वितरण प्रणालीवर २४०६ २३६६ या लेखाशिर्षांतर्गत उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना विविध कारणांमुळे येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत**

**(२४) * १७२९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असून दुष्काळ, प्रतिकुल वातावरण, तसेच मच्छीमारी बंदरात सुविधांचा अभाव इत्यादी कारणांमुळे मासेमारी व्यवसाय अडचणीत आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अलिबाग शहरातील कोळीवाडा व आक्षी साखर या दोन बंदरातून शेकडो मच्छिमार बोटींच्या सहाय्याने मासेमारी करीत असून आक्षी साखर मच्छिमार बंदरांच्या विकासासाठी १५९ कोटी ९१ लाख ७५ हजार ६९२ रुपयांचा निधी शासनाने मागील वर्षी मंजूर केला असून उक्त निधीतून आक्षी साखर येथे ग्रोयन्स बंधारा जेट्टी

पोहोचरस्ता तयार करणे तसेच खाडीतील नौकानयन भागातील गाळ काढणे इ.कामे करण्यात येणार होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाड्यांमध्ये गाळ साचल्याने तसेच इतर अन्य कारणास्तव मच्छीमारी बोटींचे मार्गक्रमण करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छीमारांच्या अडचणी दूर करण्याबाबत तसेच त्यांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यामध्ये मच्छिमारांना बंदरामध्ये सुविधा देण्यासाठी ४५ मासळी उतरविण्याची केंद्रे असुन मच्छिमारांना देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने नांदगांव, बोर्ली मांडला, राजपुरी, कोर्लाई, जीवना, दिघी इ. महत्त्वाच्या बंदरांवरील बांधकामे प्रगतीत आहेत.
(२) होय.

कोळीवाडा व आक्षी साखर येथे खाडी मुखाजवळ ग्रोयसन्स बंधारा बांधणे, गाळ काढणे, जेट्टी व पोहच रस्ता तयार करणे, या कामाच्या रु.१५९.९२ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन पर्यावरण मान्यता व निधी उपलब्धतेनुसार काम करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

राज्यातील खाड्यांमधील गाळ काढण्याच्या दृष्टीने प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला असुन मान्यतेनुसार काम करण्याचे नियोजन आहे. तसेच ग्रामीण पायाभूत विकास निधी, राष्ट्रीय कृषी विकास योजना, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना, जिल्हा वार्षिक योजनांच्या माध्यमातुन मच्छिमारांना सोयी सुविधा पुरविण्याच्या उपाययोजना करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या माध्यमातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(२५) * १४ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती मंजुळा गावित (साक्री), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळ, अतिवृष्टी, नापिकी इ. अनेक कारणास्तव शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सुरु केलेल्या पिक विमा योजनेंतर्गत अनेक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे वेळेत व वस्तुनिष्ठ न होणे, नुकसानीबाबत ऑफलाईन तक्रारी न स्विकारणे, बँक खाते आधार लिंक नसणे इ.अनेक तांत्रिक कारणास्तव शेतकऱ्यांच्या पिक विम्याचे दावे नाकारण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास तात्काळ पंचनामे करुन २५ टक्के अग्रिम रक्कम विमा कंपनीने शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने आदेश काढूनही त्याची अंमलबजावणी न होणे तसेच पिक विम्याचे रु.२०२ कोटी वितरित करण्यास ओरिएंटल कंपनीने नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई न देणाऱ्या संबंधित सर्व विमा कंपन्यांवर गुन्हा दाखल करावा, असे निर्देश जिल्हा विकास समन्वयक व सनियंत्रण (दिशा) समितीच्या दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजीच्या बैठकीत देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये फळबागा व शेतजमिन अस्तित्वात नसतानाही तसेच शासकीय जमिनीवर विमा उतरविणे, नापिक वा कमी क्षेत्र असलेल्या जमिनीचा जास्त रक्कमेचा विमा उतरविणे, बोगस शेतकऱ्यांची नावे दाखवून विम्याची रक्कम परस्पर अन्य खात्यात वळविणे, चुकीचे पंचनामे, शेतकऱ्यांचा गटक्रमांक व खातेक्रमांकाचा आधार घेवून बोगस पिक विमा उतरविणे इ.अनेक पध्दतीने बोगस प्रकरणांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम तात्काळ वितरित करणे तसेच बोगस विमा प्रकरणांत गुन्हे दाखल करुन संबंधितांविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

पिक विमा योजनेच्या कार्यप्रणालीनुसार नुकसानीबाबत ७२ तासांच्या आत ऑनलाईन तक्रारी/अर्ज करणे अपेक्षित आहे. तसेच बँक खाते आधार लिंक नसल्यास पीक विम्याची नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यास अडचणी येतात.

(३) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२३ मध्ये राज्यात विविध जोखीम बाबींकरिता रु.७८५६.४४ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली असून त्यापैकी रु.७५७२.८६ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

खरीप हंगाम, २०२४ मध्ये शेतकऱ्यांना राज्यात एकूण १,६७,९०,०४८ अर्जाव्दारे पिक विमा योजनेत सहभाग घेऊन १,१२,२१,४२५ हेक्टर क्षेत्रावरील पिक विमा संरक्षित केली आहेत. खरीप हंगाम, २०२४ मध्ये राज्यात विविध जोखीम बाबींकरिता दिनांक २५.०२.२०२५ अखेर रु.१२८८.५० कोटी अंतरिम नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली असून त्यापैकी रु.५२.९३ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे आहे.

तथापि, प्रधानमंत्री पिक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येत असल्याने, सदर मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) अशंत: खरे आहे.

पिक विमा उतरविण्यासंदर्भात निदर्शनास आलेल्या अयोग्य बाबींची तपासणी करुन खरीप हंगाम, २०२४ मध्ये ४.४५ लाख अयोग्य विमा प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत. (पिक विमा योजनेंतर्गत एकूण ४.२९ लाख आणि फळपीक विमा योजनेंतर्गत १५,९०२ अयोग्य विमा प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत. )

(६) राज्यात खरीप २०२४ हंगामात ४.४५ लाख अयोग्य विमा प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत. त्यापोटी कोणताही विमा हप्ता विमा कंपन्याना दिलेला नाही. राज्यात १०७ सामायिक सुविधा केंद्र (C.S.C.) केंद्र चालकांचा परवाना रद्द करण्यात आला असून २४ सामायिक सुविधा केंद्र (C.S.C.) केंद्र चालकांविरुध्द पोलीस स्थानकात गुन्हा नोंद केला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसईमधील ससूपाडा (जि.पालघर) भागातील वन विभागाची जमीन बेकायदेशीररित्या राष्ट्रीय उद्यानातून वगळल्याबाबत

**(२६) * ११६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईमधील ससूपाडा (जि.पालघर) येथील वन विभागाची ७ गुंठे जमीन राष्ट्रीय उद्यानातून वगळण्याच्या प्रस्तावाकरीता अनुकूल अहवाल देण्यासाठी मांडवी विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी श्री.संदिप चौरे यांनी २० लाख रुपयांची मागणी केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन उक्त अधिकाऱ्याच्या मीरारोड येथील सदनिकेवर धाड टाकून लाखो रुपयांची रोकड व ५७ तोळे सोने हस्तगत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जागेवर अनेक औद्योगिक आस्थापनांनी अतिक्रमण करुन बेकायदा बांधकामे, महामार्गाची कामे, गौण खनिज उत्खननासाठी वन विभागाच्या जागांची विल्हेवाट लावणे, यासंदर्भातील कामे वन परिक्षेत्र अधिकारी यांच्या कारकिर्दित बेकायदेशीररित्या मंजूर करण्यात आली असून यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे अंशत: खरे आहे. सदर वन जमीन ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील नसून डहाणू वन विभागातील मांडवी वनपरिक्षेत्रातील आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने श्री.चौरे, वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारित अधिनियम, २०१८) चे कलम ७, १२ अन्वये दिनांक २४.१२.२०२४ रोजी मांडवी पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे गु.र.नं.३२८/२०२४ दाखल केलेला आहे तसेच श्री.चौरे यांना शासन आदेश दिनांक ०६.०२.२०२५ अन्वये निलंबित केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोरेवाडा (जि.नागपूर) येथील तीन वाघ व एका बिबट्याचा बर्ड फ्ल्यूमुळे मृत्यू झाल्याबाबत

**(२७) * १९५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेवाडा (जि.नागपूर) येथील काटोल रोडवर असलेल्या 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी संग्रहालयातील' तीन वाघ व एका बिबट्याचा "बर्ड फ्ल्यूची" लागण होऊन मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाघांचा मृत्यु हा "एच-५ व एन-१" मुळे (बर्ड फ्ल्यू) झाल्याचा अहवाल सेमिनरी हिल (नागपूर) येथील वन्यप्राणी उपचार केंद्राकडून प्राप्त झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन उक्त विषाणूचा प्रसार रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय, नागपूर येथे दिनांक २०.१२.२०२४ रोजी १ बिबट व २ वाघांचा तसेच दिनांक २३.१२.२०२४ रोजी १ वाघाचा मृत्यु राष्ट्रीय उच्च सुरक्षा पुशेरोग संस्था, भोपाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार एच-५ एन-१ या विषाणुमुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय येथे वन्यप्राण्यांचा विषाणुजन्य आजारामुळे मृत्यू होऊ नये म्हणून प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- बाधित प्राण्यांचे पिंजरे निर्जंतुक करण्यात आले आहेत.
- प्रचलित नियमांतील तरतुदीनुसार मृत प्राण्यांचे मृतदेह नष्ट करण्यात आले आहेत.
- सर्व कर्मचाऱ्यांना पी.पी.ई. किट उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
- सदर क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अन्य क्षेत्रात जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सर्व कर्मचारी व प्राण्यांच्या नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय उच्च सुरक्षा पुशेरोग संस्था, भोपाळ येथे पाठवून धोका नसल्याची खात्री करण्यात आली आहे.
- संभाव्य धोका टाळण्यासाठी कोंबडीच्या मांसाचा पुरवठा बंद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बोगस बि-बियाणे खत विक्रीवर आळा घालणेसह दरवाढीवर नियंत्रण ठेवून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२८) * २५६ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला**

**पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बि-बियाणे आणि रासायनिक खते, युरिया, किटकनाशके इत्यादींच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) त्यातच राज्यात कृषि विभागाने टाकलेल्या धाडीत अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात बोगस व भेसळयुक्त खते, किटकनाशके व युरिया, अवैध व कृत्रिम साठे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे शेतमालाला चांगला भाव मिळत नसताना दुसरीकडे बि-बियाणे व खतांच्या वाढत्या किंमती व बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, बोगस बि-बियाणे व खते विक्री प्रकरणी कारवाई केलेल्या अनेक कंपन्या नावे बदलून पुन्हा सुरु असून त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यास शासनाला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन दरवाढ नियंत्रण, बोगस बि-बियाणे व खतांवार आळा घालणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच यास जबाबदार कंपन्या व अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) बि-बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके यांच्या दरात मागील काही वर्षात काही प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) कृषी आयुक्तालयाकडून दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत एकूण ४४०१६ खत विक्रेत्यांची व ५६४ खत उत्पादकांची तपासणी करण्यात आलेली आहे. एकूण ३३ ठिकाणी खतांच्या संदर्भामध्ये पोलिस केस दाखल केलेल्या असुन २८३.५० मे.टन खत साठा जप्त करण्यात आलेला आहे.

किटकनाशकांबाबत राज्यात एकूण २८२७७ विक्रेत्यांची व १८० उत्पादकांची तपासणी दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ अखेर करण्यात आलेली आहे. एकूण १० ठिकाणी पोलिस केस दाखल केलेल्या असुन २.१ मे.टन व ५.०३ कि. लि. किटकनाशकांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

(३) बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान भरुन देण्याची कायद्यात तरतुद नाही मात्र कापूस पिकामध्ये महाराष्ट्र कापूस बि-बियाणे (पुरवठा, वितरण व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ अन्वये बाधित शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे.

(४) हे खरे नाही.

विविध कायद्यांतर्गत केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने परवाने रद्द केलेल्या खते / बोगस बियाणे विक्रेते नवीन नावाने परवाने काढून त्याच व्यापारात आल्यास त्यांना ई-परवाना प्रणालीमध्ये स्वयंचलितरित्या Track व Trace करण्याची सुधारणा करण्याबाबत शासनाने कृषी आयुक्तालयास दिनांक ०२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.

(५) अप्रमाणित कृषि निविष्ठांचे बाबतीत संबंधित कायद्यान्वये विक्रेते व कंपन्या यांचेवर कायदेशीर कार्यवाही केली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील रमाई आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थी यादीमध्ये बोगस नावे टाकून गैरव्यवहार केल्याबाबत

**(२९) * १२८६ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात रमाई आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थी यादीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी अभियंत्यांनी अनेक बोगस नावे टाकून गैरव्यवहार केला असून उक्त जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी महानगरपालिका आयुक्त कार्यालयासमोर दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी रमाई आवास योजनेमधील लाभार्थी निवड व योजना राबवितांना गैरव्यवहार झाला असल्याची शंका व्यक्त करुन संबंधित कारवाई करावी अशी मागणी काही नागरिकांनी केली होती. तथापि, तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता आरोपांमध्ये आजतागायत तथ्य आढळून आले नाही.

(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता कार्यालयीन सुट्टीच्या दिवसात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.